२१३

**RNI No. MAHBIL /2009/31748**
**Reg. No. MCS /174/2016 -18**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—अ-मध्य उप-विभाग

वर्ष २, अंक ६४(६)] मंगळवार, ऑक्टोबर २५, २०१६/कार्तिक ३, शके १९३८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

### असाधारण क्रमांक ११५

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ ऑक्टोबर २०१६

**आदेश**

क्रमांक रानिआ/नप/२०१६/प्र. क्र. ३७/का. ६.—ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के व २४३-झेड-ए नुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे ;

२. आणि, ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने आदेश रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र. १७/का ५, दिनांक ३० जुलै २०११ अन्वये उमेदवाराने महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमध्ये करावयाची खर्चाची मर्यादा विहित केली आहे ;

३. आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश सन २०१६ अन्वये नगरपरिषदेच्या अध्यक्ष पदाकरिता थेट निवडणूक घेण्याची तरतूद केली आहे ;

४. आणि ज्याअर्थी, या सुधारणानुसार महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) चे कलम ५१ अ-१ अ च्या पोट-कलम ३ नुसार अध्यक्षाची निवडणूक परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीबरोबर एकाच वेळी घेण्यात येईल आणि नगरपरिषदेच्या निवडणुका घेण्यासंदर्भातील कार्यपद्धती अशा निवडणुकीस, योग्य त्या फेरफेरांसह, लागू होईल अशी तरतूद आहे ;

५. आणि ज्याअर्थी, सन २०११ च्या निवडणुकीमध्ये प्रत्येक प्रभागात कमीत कमी ३ व जास्तीत जास्त ५ सदस्य निवडावयाचे होते. शासनाने आता होणाऱ्या निवडणुकांमध्ये बहुसदस्यिय प्रभाग पद्धत लागू केली असून या सुधारणेनुसार एका प्रभागात कमीत कमी २ ते जास्तीत जास्त ३ सदस्य निवडून द्यावयाचे आहेत. त्यामुळे २०११ च्या निवडणुकीशी तुलना करता २०१६ मध्ये होणाऱ्या निवडणुकीत प्रत्येक प्रभागात उभ्या राहणाऱ्या उमेदवारास सरासरी निम्म्या व्यक्तींशी प्रचाराकरिता संपर्क करावयाचा आहे. प्रभागांची लोकसंख्या निम्मी झाल्याने सदस्य पदाच्या निवडणुकीकरिता सद्या अस्तित्वात असलेली खर्च मर्यादा बदलण्याची आवश्यकता नाही.

६. आणि त्याअर्थी, नगरपरिषदेच्या सदस्य पदाच्या निवडणुकीमध्ये उमेदवारानी आणि अध्यक्ष पदांकरिता थेट निवडणुकीमध्ये उमेदवारांनी करावयाच्या खर्चाची मर्यादा निश्चित करणे आवश्यक आहे. त्याकरिता राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे :—

**आदेश**

६.१ नगरपरिषदेच्या सदस्य पदाच्या निवडणुकीकरिता उमेदवारांनी करावयाच्या खर्चाची मर्यादा राज्य निवडणूक आयोगाचे आदेश रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र. १७/का ५, दिनांक ३० जुलै २०११ मध्ये निश्चित केल्याप्रमाणेच राहील. ती पुन्हा खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेली आहे.

| अ.क्र. (१) | स्थानिक स्वराज्य संस्था (२) | उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा (३) |
|---|---|---|
| १ | "अ" वर्ग नगरपरिषदा | ३,००,००० |
| २ | "ब" वर्ग नगरपरिषदा | २,५०,००० |
| ३ | "क" वर्ग नगरपरिषदा | १,५०,००० |
| ४ | नगरपंचायत | १,५०,००० |

६.२ नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीकरिता उमेदवारांनी करावयाच्या खर्चाची मर्यादा प्रथमच खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. (१) | स्थानिक स्वराज्य संस्था (२) | नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीकरिता उमेदवारांनी करावाच्या खर्चाची मर्यादा (३) |
|---|---|---|
| १ | "अ" वर्ग नगरपरिषदा | १०,००,००० |
| २ | "ब" वर्ग नगरपरिषदा | ७,५०,००० |
| ३ | "क" वर्ग नगरपरिषदा | ५,००,००० |

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

**ध. मा. कानेड,**
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ ऑक्टोबर २०१६

### शुद्धिपत्र

क्रमांक रानिआ/नप/२०१६/प्र. क्र. ३७/का. ६.—ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के व २४३-झेड-ए नुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे ;

२. आणि, ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्रमांक रानिआ/नप/२०१६/प्र.क्र. ३७/का ६, दिनांक २१ ऑक्टोबर २०१६ अन्वये नगरपरिषदांच्या सदस्य आणि नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढविण्याऱ्या उमेदवारांनी करावयाच्या खर्चाची मर्यादा निश्चित करणेबाबत खर्चाची मर्यादा विहित करण्याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत. या आदेशांच्या परिच्छेद ६.१ मधील तक्त्यातील अ. क्र. २ समोरील ''ब'' वर्ग नगरपरिषदामधील उमेदवारांनी करावयाच्या खर्चाची मर्यादा रुपये २,५०,००० ऐवजी रुपये २,००,००० अशी वाचण्यात यावी.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

**ध. मा. कानेड,**
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.